**नि.दि.दा.क्र. २९/२०२२**

**नि.क्र. ११ वरील आदेश**

०१) उप–अधिक्षक भुमी अभिलेख, उमरखेड यांची कोर्ट कमिशनर म्हणून नियुक्ती करुन त्यांच्या मार्फत या प्रकरणातील वाद मिळकतींची म्हणजेच मौजे तिवडी, ता. उमरखेड येथिल शेत भुमापन क्र. २४ एकुण क्षेत्रफळ २१ एकर ३२ गुंठे ज्याची पुढे विभागणी होवुन शेत सर्व्हे क्र. २४/१ क्षेत्रफळ १० एकर २५ गुंठे व शेत सर्व्हे नं. २४/२ क्षेत्रफळ ११ एकर ०७ गुंठे याची मोजणी करुन मिळावी यासाठी वादींनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०२) प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी नि.क्र. १२ प्रमाणे पुरसिस सादर केले आहे. त्यांच्या कथनेप्रमाणे सदर वाद जमिनीचे मोजणीचा अर्ज हा मान्य असल्याने मोजणी करून हद्‌दी खुणा कायम करण्याचे निर्देष देण्यात यावे अशी प्रतिवादींनी विनंती केली आहे.

०३) वादी यांच्या विधीज्ञांनी सादर केलेला युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतच्या अर्जाचे व प्रतिवादींच्या खुलाशाचे वाचन केले. अभिलेखाचे अवलोकन केले. मुळ दाव्यात देखील वादींनी अशी मागणी केली आहे की, वाद मिळकतींची शासकीय मोजणी करुन हद्‌दीच्या खुणा कायम करुन मिळाव्यात. वादींच्या कथनेप्रमाणे, वादी व प्रतिवादीमध्ये शेतजमीन वाटुन घेतलेली आहे व त्यांच्यामध्ये शेतजमिनीचे हद्‌दीवरुन वाद आहेत. वाटुन मिळालेल्या जमिनीच्या हद्‌दीच्या खुणा कायम करणे आवश्यक आहे. त्यााकरीता कोर्ट कमिश्नर व्दारे शासकीय मोजणी होणे जरूरी आहे. वादाचे समुळपणे निराकरण करण्यासाठी प्रस्तूत अर्ज मंजूर करण्यात यावा अशी वादींच्या वतीने विनंती करण्यात आली.

०४) वादपत्रातील तसेच प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी दाखल केलेले म्हणणे/पुरसिस नि.क्र. १२ चे कथन विचारात घेता व पक्षकारांतील त्यांच्या मिळकती संबंधी वाद कायमस्वरुपी निकाली काढण्यासाठी तसेच दावा मिळकतीं वरील हद्‌दी न्यायालयासमोर येण्याकरीता सदर मिळकतींची कोर्ट कमिशनर यांच्या मार्फत मोजणी होणे आवश्यक वाटते. ज्या वाद मिळकतींची सत्य परिस्थीती शासकीय मोजणी व्दारे या प्रकरणाच्या अभिलेखावर आल्यास उभय पक्षकारांना

त्यांचे वाद—कथन योग्य त्या पुराव्यानिशी शाबीत करणे सोयीचे होणार आहे. सदर कोर्ट कमिश्नरच्या नियुक्तीसाठी व शासकीय मोजणीसाठी लागणारे शुल्क भरण्यास वादींनी तयारी दर्शवली आहे. अशापरिस्थितीत, प्रस्तुत दाव्यात उद्‌भवलेल्या वादाचे पुर्णपणे निराकरण करण्याकरीता व उभय पक्षकारांमधील त्यांच्या मिळकती संबंधी सर्व वाद एकाच प्रकरणात निकाली काढण्याकरीता व प्रकरणांची संख्या वाढु नये म्हणुन वाद मिळकतींची पाहणी कोर्ट कमिशनर तर्फे करुन त्याची मोजणी करणे आवश्यक ठरते. करीता, वादींचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र ठरतो. अंततः, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो :—

## आदेश

०१. प्रस्तूत अर्ज (निशाणी क्र. ११) हा मंजूर करण्यात येतो.

०२. उप—अधिक्षक भुमी अभिलेख, उमरखेड यांची या प्रकरणात कोर्ट कमीशनर म्हणुन नेमणुक करण्यात येते व त्यांना असे निर्देश देण्यात येते की, या दाव्यातील वादमिळकती म्हणजेच मौजे तिवडी, ता. उमरखेड येथील जुना शेत सर्व्हे क्र. २४ यामधील शेत सर्व्हे नं. २४/१ व २४/२ या मिळकतींची स्थळ पाहणी करुन एकत्रित मोजणी करुन त्याच्या हद्‌दीखुणा कायम करून त्याबाबतचा सविस्तर स्वयंस्पष्ट अहवाल मोजणी नकाशासह या न्यायालयात लवकरात लवकर सादर करावा.

०३. वादींनी त्यांच्या वादमिळकतींची मोजणीसाठी आवश्यक असणारे शुल्क उप—अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, उमरखेड येथे नियमांप्रमाणे भरणा करावे व उप—अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय यांनी १५ दिवसाच्या आत फी संदर्भात आवश्यक तपशील वांदी यांना द्‌यावा.

०४. कोर्ट—कमीशनर यांना सदर मोजणीकामी व स्थळ पाहणीकामी लागणारे कागदपत्रे व त्याकामी लागणारी सर्व माहिती उभय पक्षकारांनी त्यांना पुरवावी.

०५. उभय पक्षकारांनी या आदेशाची नोंद घ्यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PRUTHAVI SANJAY PATIL
Date: 2022.09.21 10:52:39 +0530

दिनांक :— २०/०९/२०२२

( पी.एस.पाटील )
दिवाणी न्यायाधिश क. स्तर,
उमरखेड.

प्रमाणपत्र

याव्दारे मी असे प्रतिपादन करतो की, वरील आदेश व त्याची तयार केलेली पी.डी.एफ. प्रत यातील सर्व मजकुर मूळ आदेशाशी तंतोतंत बरोबर आहे.

आदेशाचा दिनांकः २०/०९/२०२२

आदेश स्वाक्षांकित दिनांकः २०/०९/२०२२

लघुलेखकाचे नावः य.वि.पोरकुटे

आदेश अपलोड केल्याचा दिनांकः २१/०९/२०२२